


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ८९, गुरुवार २७ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पायाला जखम तरीही खा. लंके यांचा सातारा दौरा!

## वाई, पाचगणी, महाबळेश्वर येथील कार्यक्रमांना हजेरी

सातारा : प्रतिनिधी

**पायात काटा भरल्याने झालेले कुरूप शस्त्रक्रिया करून काढल्याने जखम झालेली असतानाही खासदार नीलेश लंके यांनी सातारा जिल्हयातील वाई, पाचगणी आणि महाबळेश्वरचा दौरा करत विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. आजारी असतानाही केवळ चाहत्यांच्या प्रेमाखातर लंके हे लंगडत या दौऱ्यात सहभागी झाल्याने सातारकरांनी आश्चर्य व्यक्त केले.**

शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी खा. लंके यांचा पाच दिवस विश्रांतीचा सल्ला दिला होता. मात्र पूर्वनियोजित कार्यक्रमांना हजेरी लावण्यासाठी खा. लंके यांनी पायाचे दुखणे दुर सारून सातारा येथे जाण्याचा निर्णय घेतला. खा. लंके यांच्या समर्पण भावाने या दौऱ्यात त्यांना भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांनी प्रभावित केले.

पाचगणी येथील तेजस्विनी भिलारे, नितीन भिलारे व जतिन भिलारे यांच्या किंगबेरी फार्मला भेट देऊन खा. लंके व त्यांच्या समवेत असलेल्या सहकाऱ्यांनी स्ट्रॉबेरी शेती आणि त्याची संबंधित उत्पादने या विषयी माहीती घेतली. भिलारे परिवाराने युरोपहून स्ट्रॉबेरीची शेती आणली. त्यानंतर पाचगणी, महाबळेश्वरच्या पर्यटनास अधिक चालना मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

खा. लंके यांच्यासमवेत नगरसेवक योगीराज गाडे, डॉ. बाळासाहेब कावरे, संजय जाधव, डॉ. प्रमोद जाधव, चंद्रकांत मोढवे, योगेश शिंदे, दादा दळवी, विनोद गवते हे होते.



### खा. लंके यांनी प्रथमच घेतली स्ट्रॉबेरीची टेस्ट !

खा. नीलेश लंके हे सामान्य कुटूंबातून आलेले आहेत. विशेष म्हणजे आजवर त्यांनी कधीही स्ट्रॉबेरी, ज्युस किंवा क्रीमचा आस्वाद घेतलेला नव्हता. स्थानिकांनी आग्रह केल्यानंतर त्यांनी स्ट्रॉबेरीचा आस्वाद घेतला. स्ट्रॉबेरीची चव घेतल्यानंतर आरोग्यासाठी स्ट्रॉबेरी फायदेशीर असल्याने खाण्यास हरकत नसल्याची टिपन्नी लंके यांनी केली.

### आंतरजिल्हा बदलीसाठी पाठपुरावा

यावेळी जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी आंतरजिल्हा बदलीचा सातवा टप्पा राबविण्यासंदर्भात पुढाकार घेण्याची मागणी खा. लंके यांच्याकडे केली. गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीचा आपण पाठपुरावा करू अशी ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली.

### नगरचे विद्यार्थी भारावले !

खा. लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी रेंज हिल्स स्कुलला भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विशेष म्हणजे या स्कुलमध्ये नगर जिल्हयातीलही विद्यार्थी होते. लंके यांनी त्या विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या कुटूंबियांचीही ओळख सांगितली. त्यापैकी एका विद्यार्थीनीच्या आजीला फोन करून विद्यार्थीनीस बोलण्याची संधी दिली. आपल्या जिल्ह्याचे खासदार भेटल्याने विद्यार्थी भारावून गेले. खा. लंके हे सर्वसामान्य व्यक्तीमत्व आपल्या शाळेत आल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

### शिक्षण महोत्सवात सहभाग

सातारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती शिक्षण महोत्सवामध्ये खा. लंके यांनी सहभाग नोंदविला. जिल्हा परिषद व नगरपालिका शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात शिक्षणाचे महत्व अधोरेखीत करून अधिकाऱ्यांच्या सहकार्याने शिक्षण पध्दतीत चांगल्या सुधारणा करता येतील असा विश्वास खा लंके यांनी व्यक्त केला.

### आरोग्यदायी पेयाची माहीती

खा. लंके यांनी रिषभ खन्ना यांच्या राईझ अप कोम्बुचा फार्मला भेट दिली. तिथे ग्रीन टीच्या फर्मेटेंशनद्वारे तयार होणाऱ्या आरोग्यदायी पेयाची त्यांनी माहीती घेतली. असे आरोग्यवर्धक पेय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचले पाहिजे असे मत लंके यांनी व्यक्त केले.

# बसमधून दागिने लांबविण्याची दुसरी घटना

## निघोजला जाणाऱ्या महिलेचे १ लाख ६५ हजारांचे दागिने लांबविले

पारनेर : प्रतिनिधी

**नगर ते पारनेर व पारनेर ते निघोज या एस.टी. बसच्या प्रवासात अश्विनी योगेश नरसाळे यांचे १ लाख ६५ हजार रूपयांचे दागिने अज्ञात चोराने लांबविले. पारनेर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये वाडेगव्हाण शिवारात आळंदी ते आंबाजोगाई या बसमधूनही महिलेचे १ लाख ४४ हजार रूपयांचे दागिने लांबवण्यात आले होते.**

अश्विनी योगेश नरसाळे रा. तपोवन रोड, नगर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अश्विनी यांचे लहान भाऊ राहुल पांडूरंग शेटे यांच्या विवाहासाठी त्या नगर येथून पारनेरला व पारनेरहून निघोज येथे एस.टी.बसने प्रवास करून पोहचल्या. भावाच्या लग्नासाठी अश्विनी



यांनी बॅगमध्ये चार तोळे वजनाचे सोन्याचे मोठे टेम्पल डिझाईनचे मंगळसुत्र तसेच दिड तोळा वजनाचे मिनी मंगळसुत्र असे साडेपाच तोळे दागिणे आणले होते. निघोज येथे पोहचल्यानंतर त्यांनी बॅगमध्ये दागिने आहेत का याची खात्री केली असता दागिने आढळून आले नाहीत. त्यानंतर आपले दागिने कोणीतरी चोरून नेल्याची त्यांची खात्री पटली. त्यानंतर त्यांनी पारनेर पोलीस ठाण्यात जाउन फिर्याद दाखल केली.

नगर येथे बसमध्ये जागा नसल्याने अश्विनी यांनी चालकाच्या केबिनमध्ये बसून प्रवास केला. बस थोडे अंतर पारनेरच्या दिशेने आल्यानंतर एक अूनोळखी महिला दोन वर्षांची मुलगी घेऊन अश्विनी यांच्याजवळ बसली होती. पुढील थांब्यावर ती महिला उतरल्याचे अश्विनी यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

### एक आरोपी जेरबंद, दुसरा पसार

वाडेगव्हाण येथे जेवणासाठी बस थांबल्यानंतर महिलेचे दागिने लांबविणारा भामटा त्याच बसमधील सहप्रवाशी होता. सुपा पोलीस ठाण्यात बस नेण्यात आल्यानंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीस पोलीसांनी ताब्यात घेतले. तर नगर ते निघोज प्रवास करणाऱ्या महिलेचे दागिने लांबविणाऱ्या भामटयाचा शोध लागलेला नाही. पारनेर पोलीस या चोरीचा तपास करत आहेत.

# देशमुख हत्या प्रकरणात ॲड.निकम यांची नियुक्ती

## मस्साजोगकरांच्या अन्नत्याग आंदोलनाला यश

बीड : प्रतिनिधी


**जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात राज्य सरकारच्या वतीने विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः याबाबतची माहिती दिली. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती.**




संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी आपल्या विविध मागण्यासाठी मस्साजोग येथे ग्रामस्थांसोबत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या भूमिकेकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे. ग्रामस्थांच्या मागण्यांमधील प्रमुख मागण्यांमध्ये उज्वल निकम यांची सरकारी वकिल म्हणून नियुक्ती करण्याची मागणी होती. त्यानुसार आता राज्य सरकारच्या वतीने ही मागणी मान्य करण्यात आली आहे.

या संबंधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणी महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून, तर ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर मुख्यमंत्र्यांनी मला या प्रकरणी वकीलपत्र स्वीकारण्याची मागणी केली होती. मात्र काही कारणामुळे मी नकार दिला होता. मात्र मस्साजोग येथील ग्रामस्थांनी अन्न त्याग आंदोलन सुरू केले. माझ्या नियुक्तीसाठी त्यांनी अन्न त्याग करावे, ही चांगली गोष्ट नाही. त्यांचा विश्वास माझ्यावरती आहे. त्यामुळेच मी आता मुख्यमंत्र्यांना नियुक्तीची विनंती केली होती. त्याप्रमाणे त्यांनी नियुक्ती करण्याचे आदेश काढले असल्याचे त्यांनी मला कळवले असल्याचे उज्वल निकम यांनी म्हटले आहे. आपल्या देशात कायदा हा सर्वात मोठा आहे. त्यामुळे येथे न्याय मिळतो. त्यामुळेच ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग सोडावा आणि निश्चितपणे आरोप पत्र दाखल झाल्यानंतर हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला जाईल, याबाबत मी आश्वासित करत असल्याचे उज्वल निकम यांनी म्हटले आहे.



# चंदेरी

## प्रतीक बब्बर लग्नबंधनात!

**दिवंगत अभिनेत्री स्मिता पाटील व अभिनेते राज बब्बर यांचा मुलगा अभिनेता प्रतीक बब्बर लग्नबंधनात अडकला आहे. १४ फेब्रुवारीला प्रतीकने गर्लफ्रेंड प्रिया बॅनर्जीशी लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली आहे. प्रतीक बब्बर व प्रिया बॅनर्जीच्या लग्नाचे फोटो आता समोर आले आहेत. मोठ्या थाटामाटात दोघांनी लग्न केलं आहे.**



प्रतीकची दुसरी पत्नी प्रिया बॅनर्जीने सोशल मीडियावर लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. मी प्रत्येक जन्मात तुझ्याशीच लग्न करेन, असं कॅप्शन लिहित प्रियाने लग्नातील खास क्षण शेअर केले आहेत. लग्नासाठी दोघांनी खास ऑफ व्हाइट रंगाचा पेहराव केला होता. प्रियाने लेहेंगा तर प्रतीकने शेरवानी घातली होती. दोघं या पेहरावात खूपच सुंदर दिसत आहेत. प्रतीक बब्बरची दुसरी पत्नी प्रिया ही दाक्षिणात्य अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य सिनेमातून तिने करिअरला सुरुवात केली होती. याशिवाय प्रिया ऐश्वर्या राय-बच्चनच्या 'जज्बा' चित्रपटात झळकली होती. तसंच तिने 'बेकाबू', 'राणा नायडू' आणि 'हॅलो मिनी' यांसारख्या सीरिजमध्ये काम केलं आहे. प्रतीक बब्बरचं पहिलं लग्न चित्रपट निर्माती सान्या सागरशी झालं होतं. अनेक वर्षे डेट केल्यानंतर २०१९मध्ये प्रतीक व सान्याने लग्न केलं होतं. पण वर्षभरातच दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले आणि दोघांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. जानेवारी २०२३ मध्ये प्रतीक व सान्याचा अधिकृतरित्या घटस्फोट झाला. त्यानंतर नोव्हेंबर २०२३ मध्ये प्रतीकने प्रिया बॅनर्जीशी साखरपुडा केला.


## ८ वर्षांनी अभिनेत्रीला झाली मुलगी, नाव ठेवले खूपच खास!



अभिनेत्री डिंपल झांगियानी लग्नानंतर आठ वर्षांनी आई झाली असून, तिने १ फेब्रुवारीला मुलीला जन्म दिल्यानंतर आता तिचे नावही ठेवले आहे. शिवोना असे नाव ठेवले असून, हे नाव भगवान शंकरापासून प्रेरित आहे. आम्ही सगळे शिवभक्त आहोत आणि शिवोना हे नाव कॉमन नाही, असे डिंपल म्हणाली. डिंपलने डिसेंबर २०१६ मध्ये हिरे व्यापारी सनी असरानी यांच्याशी लग्न केलं होतं. डिंपल म्हणाली, की आम्हाला वाटलं की मुलगा होईल. त्यामुळे आम्ही तशी तयारी केली होती. पण तरीही आम्ही मुलीचं एक नावही शॉर्टलिस्ट केलं होते. बाळ होऊ देण्याआधी सनी आणि मला एकत्र वेळ घालवायचा होता. नंतर आम्ही बाळाचं प्लॅनिंग केलं. त्यात आम्हाला बऱ्याच अनपेक्षित आव्हानांचा सामना करावा लागला. कोणतीही वैद्यकीय समस्या नव्हती. तरीही मी गरोदर राहत नव्हते. त्यामुळे खूप तणावात होतो. पण देव योग्य वेळी आशीर्वाद देतो, असे डिंपल म्हणाली. आई होणं माझं स्वप्न होतं. मला लहान मुलं खूप आवडतात. प्रेग्नेन्सी टेस्ट किटवर पॉझिटिव्ह साइन पाहिल्यानंतर मला विश्वासच बसत नव्हता. नंतर आम्ही सगळ्या चाचण्या करून गरोदर असल्याची खात्री करून घेतली, असं डिंपल म्हणाली. ते नऊ महिने खूप कठीण होते. मला खूप त्रास झाला. जेवणं जायचं नाही, मळमळ व्हायची. पहिले चार महिने मला द्रवपदार्थांवर होते, असेही तिने सांगितले. डिंपलच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास ती 'कुछ इस तारा', 'अमृत मंथन', 'तुम्ही हो बंधू सखा तुम्ही', 'राजा की आएगी बारात', 'मिसेस पम्मी प्यारेलाल', 'बेइंतहा', 'किस देश मे है मेरा दिल', 'हम दोनो है अलग अलग' या मालिकांमध्ये दिसली आहे.

## सलमानने दिल्या प्रेमभंगातून सावरण्याच्या भारी टिप्स!

**बॉलीवूड अभिनेता सलमान खान आता ५९ वर्षांचा झाला आहे. मात्र, अद्यापही तो अविवाहित आहे. आजवर सलमानचे नाव बॉलीवूडच्या अनेक अभिनेत्रींबरोबर जोडले गेले आहे. त्याच्याशी नाव जोडलेल्या अनेक अभिनेत्रींची लग्नेही झालीत. अशात आता बॉलीवूडच्या भाईजानने ब्रेकअप झाल्यावर त्यातून स्वतःला कसे सावरायचे याच्या काही टिप्स त्याचा पुतण्या अरहान खानला दिल्या आहेत.**



सलमान खान म्हणाला, जर तुमच्या गर्लफ्रेंडनं तुमच्याबरोबर ब्रेकअप केलं असेल, तर तिला जाऊ द्या. तिला अडवू नका आणि बाय बाय म्हणा. जेव्हा तुम्हाला एखादी जखम होते तेव्हा त्यावर लावलेलं बँड -एड तुम्ही कसं काढता? हळूहळू? नाही जोरात काढता. त्यामुळे अशाच पद्धतीने हा विषयसुद्धा संपवायचा असतो. ब्रेकअप झाल्यावर घरामध्ये तुमच्या खोलीत जा आणि तुम्हाला हवं तितकं मनसोक्त भरपूर रडा. त्यानंतर हा विषय इथेच बंद करा. तसेच बाहेर गेल्यावर सामान्य प्रश्न विचारा. काय सुरू आहे? कसं सुरू आहे, असे प्रश्न विचारत नॉर्मल राहा, असे सलमान खानने सांगितले आहे. सलमान खानने विश्वासघात झाल्यावर अशा वेळी स्वतःला कसे सावरायचे याच्या टिप्स सांगितल्या आहेत. तो म्हणाला, की कायम समोरच्या व्यक्तीचा आदर आणि सन्मान करा. ज्या ठिकाणी मान नसेल अशा ठिकाणी बसण्यात काहीच अर्थ नाही. नात्यामध्ये जेव्हा तुमच्या पाठीत खंजीर खुपसण्यात आल्याचं तुम्हाला समजतं तेव्हा त्यावर पुढच्या ३० सेकंदांत निर्णय घेण्याची ताकद ठेवा. घडलेली गोष्ट सहा महिने आधीच तुम्हाला माहिती होती, अशी रिॲक्शन द्या. त्यानंतर तो विषय तिथेच संपवा. विश्वासघात प्रेमासह मैत्रीतही होतो.

### धन्यवाद, सॉरी महत्त्वाचे...

सलमान खानने धन्यवाद आणि सॉरी हे दोन शब्द किती महत्त्वाचे आहेत तेदेखील सांगितले. तो म्हणाला, जर तुम्ही काही चुकीचं वागला असाल, तर लगेच माफी मागा, सॉरी म्हणा. नात्यात आभार म्हणजेच धन्यवाद आणि सॉरी दोन्ही शब्द सहज बोलता येणं गरजेचं आहे.

## 'हम आपके हैं कौन'ची रीटा सध्या करते काय?

**१९९४ साली प्रदर्शित झालेल्या 'हम आपके हैं कौन' चित्रपट प्रचंड गाजला. सूरज बडजात्या दिग्दर्शित या चित्रपटाने त्या काळात बक्कळ कमाई केली. १९९४ साली सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट 'हम आपके है कौन' होता. या चित्रपटातील सलमान खानच्या प्रेम आणि माधुरी दीक्षितच्या निशा भूमिकेला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. तसंच चित्रपटातील गाण्यांनी तर प्रेक्षकांना वेडचं लावलं. आजही 'हम आपके हैं कौन' चित्रपट तितक्याच आवडीने पाहिला जातो. याच सुपरहिट चित्रपटातील रीटा सध्या काय करते तुम्हाला माहितीये का?**



बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये अशा बऱ्याच अभिनेत्री आहेत, ज्यांनी अभिनय क्षेत्राला रामराम केला आहे. काहींनी अपयशामुळे तर काहींना वैयक्तिक आयुष्यावर लक्ष देण्यासाठी अभिनय क्षेत्र सोडलं आहे. त्यापैकी एक म्हणजे अभिनेत्री साहिला चड्ढा. 'हम आपके है कौन' चित्रपटात साहिला चड्ढाने रिटाची भूमिका साकारली होती, जी चांगलीच गाजली. १९८५ साली साहिला चड्ढाने 'आय लव्ह यू' चित्रपटातून आपल्या अभिनय क्षेत्रातील करिअरला सुरुवात केली. बॉलीवूडमध्ये येण्यापूर्वी ती 'मिस इंडिया' विजेती झाली होती. १९८५ ते २०१४ पर्यंत साहिलाने 'दौलत की जंग', 'बोल राधा बोल', 'अब इंसाफ होगा', 'नमक', 'आंटी नंबर १' यांसारख्या बऱ्याच चित्रपटात काम केलं. साहिलाने अनेक मोठ्या चित्रपटांत काम केलं, पण तिला कधी मुख्य भूमिका मिळाली नाही. तिच्या अभिनय क्षेत्रातील करिअरमधील सुपरहिट चित्रपट म्हणजे 'हम आपके हैं कौन'. या चित्रपटातदेखील तिने सहाय्यक अभिनेत्रीची भूमिका साकारली होती. साहिलाचा शेवटचा चित्रपट 'तुलसी' होता; जो २००८मध्ये प्रदर्शित झाला होता. यामध्ये मनीषा कोइराला आणि इरफान खान मुख्य भूमिकेत झळकले होते. त्यानंतर २०१४ मध्ये ती एका शॉर्ट फिल्ममध्ये पाहायला मिळाली. ५० चित्रपट केल्यानंतर साहिलाने बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेतून एक्झिट घेण्याचा निर्णय घेतला. पुढे साहिला चड्ढाने अभिनेता निमाई बालीबरोबर लग्न केलं आणि वैवाहिक आयुष्यात ती व्यस्त झाली. दोघांना एक मुलगी आहे. साहिला सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. माहितीनुसार, अभिनेत्रीने स्वतःचं प्रोडक्शन हाउस सुरू केलं असून तिथेच काम करत आहे. या प्रोडक्शन हाउसच्या माध्यमातून वेब सीरिज आणि मालिकांची निर्मिती केली जात आहे.

## चाहतीने संजय दत्तच्या नावावर केली होती ७२ कोटींची संपत्ती!

**आपल्या आवडत्या कलाकारासाठी चाहते काहीही करण्यासाठी तयार होतात. कलाकारांना भेटता यावं, त्यांच्याबरोबर एक फोटो घेता यावा यासाठी मोठी धडपड करतात. काही चाहते तर कलाकारांना महागड्या भेटवस्तूसुद्धा गिफ्ट म्हणून देतात, तर काही चाहते आपल्या आवडत्या कलाकारावर इतकं प्रेम दाखवतात की, त्यांचं प्रेम पाहून अनेक जण चकित होतात. असंच काहीसं बॉलीवूड अभिनेता संजय दत्तबरोबरही घडलं होतं.**

संजय दत्तच्या आयुष्यातील हा जुना किस्सा आहे. एका चाहतीनं चक्क तिच्याकडे असलेली कोटींची संपत्ती संजय दत्तच्या नावावर केली होती. चाहतीनं मृत्यूपूर्वी तिची सर्व संपत्ती संजय दत्तच्या नावे केली होती. २०१८ मध्ये संजय दत्तला पोलिसांचा अचानक फोन आला होता. त्यावेळी पोलिसांनी निशा पाटील असं या चाहतीचं नाव सांगितलं होतं. पोलिसांनी त्यावेळी फोनवर पुढे सांगितलं होतं, ही महिला तुझी चाहती आहे आणि तिनं तिची ७२ कोटींची संपत्ती तुझ्या नावावर केली आहे. महिलेनं याबाबत बँकेलाही एक पत्र लिहिलं होतं. तसेच संपत्ती संजय दत्तच्या नावावर करण्यासाठीच्या प्रक्रियेला सुरुवात करा, असंही सांगितलं होतं. चाहतीनं संपत्ती नावावर केल्यानं संजय दत्तसुद्धा त्यावेळी थक्क झाला होता. त्यानं ही संपत्ती, तसेच अन्य मौल्यवान वस्तू महिलेच्या कुटुंबातील सदस्यांना देण्यात याव्यात, असं सांगितलं होतं. संजय दत्त म्हणाला होता, मी या संपत्तीवर कोणताही दावा करणार नाही. कारण मी निशाला ओळखतही नाही. त्यावर मी अधिक काही व्यक्त होऊ शकत नाही. संजय दत्तच्या वकिलांनीही त्यावेळी पुढे येत स्पष्ट केलं, संजय दत्त या सामानावर आणि संपत्तीवर कोणताही दावा करणार नाही. तसेच कुटुंबातील अन्य व्यक्तींना या वस्तू, तसेच संपत्ती मिळावी यासाठी योग्य त्या कायदेशीर मदतीसाठी तो तयार आहे. संजय दत्तच्या चाहतीचा हा किस्सा आता पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. संजय दत्तच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, त्यानं बॉलीवूड गाजवल्यानंतर आता दाक्षिणात्य सिनेविश्वाकडे आपला मोर्चा वळवला आहे. 'केजीएफ चॅप्टर २' व 'लिओ' या दोन्ही चित्रपटांनी संजय दत्तला दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही मोठी पसंती मिळवून दिली आहे. संजय दत्त आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. लवकरच तो 'केडी- द डेव्हिल' आणि 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटांतून भेटीला येणार आहे.



## जॅकलिनला सुकेशने भेट दिले खासगी जेट!

**ठग सुकेश चंद्रशेखरने पुन्हा एकदा व्हॅलेंटाईन डेनिमित्त बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसला एक रोमँटिक पत्र लिहिले आहे. पत्रात, सुकेश चंद्रशेखरने जॅकलीन फर्नांडिसला प्रेमाने बेबी गर्ल असे संबोधले आणि तिच्यावरील आपले प्रेम व्यक्त केले.**



सुकेशने लिहिले, बेबी गर्ल, सर्वप्रथम मी तुला व्हॅलेंटाईन डेच्या खूप खूप शुभेच्छा देतो, प्रिये, या वर्षाची सुरुवात आपल्यासाठी खूप सकारात्मकता आणि खूप खास गोष्टींनी झाली आहे आणि हा व्हॅलेंटाईन डे देखील खूप खास आहे. कारण तो आपल्या आयुष्यातील उर्वरित व्हॅलेंटाईन डे एकत्र घालवण्यापासून फक्त एक पाऊल दूर आहे... सुकेशने या पत्रात पुढे लिहिले आहे की, 'बेबी, मी पुढे काही बोलण्यापूर्वी, मला एक क्षण सांगायचे आहे, जॅकी, मी तुला खरोखर खूप प्रेम करतो, तू जगातील सर्वोत्तम व्हॅलेंटाईन आहेस, मी तुला वेड्यासारखे प्रेम करतो.' सुकेश पुढे म्हणाला की, या खास प्रसंगी मी तुला एक खाजगी जेट भेट देत आहे. तुझ्या नावाची पहिली अक्षरे जेटवर लिहिलेली आहेत. सुकेशने असा दावाही केला की जेटचा नोंदणी क्रमांक देखील जॅकलिनची जन्मतारीख आहे. या पत्रात सुकेशने पुढे लिहिले की, बाळा, तू नेहमीच कामाच्या शूटिंगसाठी जगभर उडत राहतेस, आता या जेटमुळे, तुझ्या आवडीनुसार आणि सोयीनुसार तुझा प्रवास खूप सोपा होईल.' पत्राचा शेवट असा केला आहे, की बेबी या व्हॅलेंटाईन डेला माझी फक्त एकच इच्छा आहे, जर मी पुन्हा जन्माला आलो तर मला तुझ्या हृदयाच्या रूपात जन्म घ्यायचा आहे. जेणेकरून मी तुझ्या आत धडधडत राहू शकेन. मी या ग्रहावरील सर्वात भाग्यवान व्यक्ती आहे. मला या आयुष्यातील सर्वात सुंदर व्यक्ती तू, माझा व्हॅलेंटाईन म्हणून सापडली. सुकेश चंद्रशेखर सुमारे २०० कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रकरणात दिल्लीतील मंडोली तुरुंगात बंदिस्त आहे. अनेकदा खास प्रसंगी, तुरुंगातून सुकेशचे जॅकलीनला लिहिलेले प्रेमपत्र उघड होते. तथापि, जॅकलिनने सुकेशसोबत कोणत्याही प्रेमसंबंधाचा इन्कार केला आहे.

## मधुरा म्हणाली, मी अपघाताने मनोरंजन विश्वात!

आपण मोठं होऊन कोणत्या क्षेत्रात जावं कोणत्या क्षेत्रात नाव कमवावं हे अनेकांचं लहान असतानाच ठरलेलं असतं. मात्र, अनेक व्यक्ती परिस्थितीमुळे स्वतःची स्वप्नं पूर्ण करू शकत नाहीत. तसेत विविध कारणांमुळे ज्या क्षेत्रात रस आहे, तिकडे न वळता दुसऱ्या एखाद्या क्षेत्राकडे वळतात. असंच काहीसं मराठमोळी अभिनेत्री मधुरा वेलणकरबरोबरही घडलं आहे. तिनं स्वतः एका मुलाखतीमध्ये याचा खुलासा केला आहे. मराठी सिनेविश्वात चित्रपट, मालिका व नाटक अशा तिन्ही माध्यमांतून मधुरा वेलणकर घराघरात पोहोचली आहे. 'नॉट ओन्ली मिसेस राऊत' या पहिल्याच चित्रपटानं तिनं प्रेक्षकांची मोठी प्रसिद्धी मिळवली. मधुराच्या आई रजनी वेलणकर आणि वडील प्रदीप वेलणकर यांनी मराठी मनोरंजन विश्वात मोठं नाव कमावलं आहे. घरातच मोठमोठे कलाकार असूनही मधुराला मनोरंजन विश्वाची गोडी लहानपणापासून नव्हती, असं तिनं सांगितलं आहे. ती म्हणाली, मी या क्षेत्रात ठरवून आलेले नाही. मला अजिबात या क्षेत्रात यायचं नव्हतं. कारण मला क्रीडा क्षेत्रात रस होता. तसेच मला एअर होस्टेस व्हायचं होतं. मी अपघातानं या क्षेत्रात आले, असं म्हणायला हरकत नाही. कारण मी एकदा दोरी मल्लखांब करताना खाली पडले होते. त्यात माझ्या हाताला लागलं. त्यावेळी मी घरी असताना या सुटीत करून पाहू म्हणून मी एक नाटक केलं. ते नाटक केल्यानंतर त्यातून एकेक पुढे काम मिळत गेलं आणि मला या क्षेत्राची आवड निर्माण झाली. जर लहानपणापासून माझं असं ठरलं असतं, तर त्या दृष्टीनं मी आकलन सुरू केलं असतं. जरी आई-बाबा या क्षेत्रात असले तरी माझ्यासाठी हा रस्ता नवीन होता, असं मधुरा वेलणकर म्हणाली.



## अभिनेत्याने सॉफ्टवेअर इंजिनिअरशी बांधली लग्नगाठ

**अभिनेता गौरव सरीनने लग्नगाठ बांधली आहे. त्याने ८ फेब्रुवारी रोजी अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या जया अरोराशी लग्न केलं. दोघांचा लग्नसोहळा दिल्लीत मोठ्या थाटामाटात पार पडला. तिला नववधूच्या रुपात पाहून मी भावुक झालो होतो, आताही लग्नाबद्दल बोलताना माझ्या अंगावर शहारे येतात. तुम्हाला एखाद्या व्यक्तीला पाहून अशी भावना येत असेल तर त्याहून सुंदर जगात काहीच नाही, असं म्हणत गौरवने त्याच्या भावना व्यक्त केल्या.**

गौरव व जया एकमेकांना मागील १५ वर्षांपासून ओळखतात. त्या दोघांच्या कुटुंबियांची मैत्री आहे. हे दोघे अडीच वर्षांपूर्वी प्रेमात पडले. जयाच्या प्रेमात पडण्याबद्दल २९ वर्षीय गौरव म्हणाला, की प्रेमाला कोणतंही कारण लागत नाही. ते आपोआप होतं. माझ्या बाबतीतही तेच घडलं. मी मागील काही वर्षांत खूप जणींना भेटलो, पण जयाबद्दल ज्या भावना होत्या त्या मला कुणाबद्दल वाटल्या नाही. मला जयाबरोबर खूप कम्फर्टेबल वाटतं. इंडस्ट्रीबाहेरच्या जोडीदाराशी लग्न केल्याने आयुष्यात समतोल राहील, असं गौरवला वाटतं. वेगळ्या प्रोफेशनमधील जोडीदार मिळाल्याने तुम्हाला मानसिक आणि भावनिकदृष्ट्या आधार मिळतो. जेव्हा दोघेही एकाच प्रोफेशनमध्ये असतात तेव्हा त्यांचे वैयक्तिक आयुष्य कामामुळे मागे पडते. एक अभिनेता म्हणून मला घरात भावनिक स्थैर्य हवे आहे आणि जया मला ते देते, असं गौरव म्हणाला. गौरव व जया सध्या त्याच्या मूळ गावी, अमृतसरमध्ये कुटुंबाबरोबर वेळ घालवत आहेत. सध्या आम्हाला हे १०-१५ दिवस माझ्या आई-वडिलांबरोबर घालवायचे आहेत. जया या महिन्याच्या अखेरीस अमेरिकेला परत जाणार आहे, मात्र नेमकी तारीख ठरलेली नाही. हनिमूनबद्दल अद्याप काही ठरवलेलं नाही. पण आम्ही आता आयुष्यभर एकमेकांबरोबर प्रवास करणार आहोत, असं गौरव म्हणाला.

### आम्ही मॅनेज करू...

जया अमेरिकेतमध्ये स्थायिक असल्याने हे दोघेही अमेरिका व भारत असा प्रवास एकमेकांसाठी करत राहणार आहेत. जेव्हा मी शूटिंग करत असेल तेव्हा जया भारतात येईल आणि जेव्हा मला वेळ असेल तेव्हा मी तिच्याबरोबर राहायला अमेरिकेला जाईल. आम्ही आधीच अडीच वर्षांपासून एकमेकांना भेटणं असंच मॅनेज करतोय, त्यामुळे सवय झाली आहे, असं गौरव म्हणाला. गौरवने चित्रपटांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी टेलिव्हिजनमधून ब्रेक घेतला आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रदर्शित झालेल्या माझ्या दशमी चित्रपटानंतर मी दुसऱ्या प्रोजेक्टचे शूटिंग पूर्ण केले. यात अरबाज खान माझ्या वडिलांच्या भूमिकेत आहे, असं गौरव म्हणाला.



## शॉर्ट न्यूज

### पाण्यात बुडून युवकाचा मृत्यू

■ **नगर :** रूईछत्तीसी (ता. नगर) येथे पाण्यात बुडाल्याने एका युवकाचा मृत्यू झाला. गजानन ज्ञानेश्वर निरगुडे (वय २३, रा. निवाळा, हिंगोली) असे मयत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गजानन निरगुडे हे पाण्यात पडल्याने त्यांच्या नातेवाईकांनी गजानन सिताराम कराळे यांनी त्यांना उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. त्यानुसार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार झावरे करत आहेत.

### कागदी कप वापरण्यावर शेवगावात बंदी

■ **शेवगाव :** नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी नगरपरिषदेच्या हद्दीत सिंगल युज प्लास्टिक आणि चहा कॉफी वा थंड पेयासाठी वापरण्यात येणारे कागदी कप वापरण्यावर बंदी घातली आहे. यासंदर्भात त्यांनी एक सविस्तर परिपत्रक जारी केले असून, शहरातील मोक्याच्या जागी नागरिकांनी चहा, कॉफी व थंड पेय घेताना कागदी कप तसेच पालेभाज्या व किराणा वा अन्य साहित्यासाठी प्लॅस्टिक पिशव्या वापरू नयेत, यासाठी उद्बोधन केले असून, अन्यथा दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

### वांबोरी उपबाजारात कांदा २५०० रुपयांपर्यंत

■ **वांबोरी :** उपबाजारात झालेल्या कांदा लिलावात २१०६ कांदा गोण्याची आवक झाली. एक नंबरचा कांदा २१०० ते २५०० रुपये, दोन नंबरचा कांदा १६०० ते २१०० रुपये तर तीन नंबरचा कांदा ३०० ते १६०० रुपये भावाने विकला गेला. तसेच गोल्टी कांद्याला १४०० ते २००० रुपये भाव मिळाला. तसेच अपवादात्मक १२ कांदा गोण्यांना २७०० रुपये तर ८४ गोण्यांना २६०० रुपये भाव मिळाला.

### पाण्याची समस्या भेडसावण्यास सुरवात

■ **राहाता :** तालुक्यातील वाकडीतील ग्रामपंचायत मार्फत नळाद्वारे पुरविले जानारे पाणी कमी दाबाने मिळत असल्यामुळे नागरिकांनमध्ये असंतोषाची भावना बघावयास मिळत आहे. राहाता तालुक्यातील वाकडीतील ठमके वस्ती येथे नळाला पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा होत नसल्याने तेथील नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला आहे. दशक्रिया दिवशी देखील नळाला पुरेसे पाणी न आल्याने या विधीसाठी आम्ही पिण्याच्या पाण्याचे जार वापरल्याचे त्यांनी यावेळी सांगितले तर अशीच परस्थिती राहिल्यास ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

### मुख्याध्यापिकेस पेटवून देण्याची धमकी

■ **संगमनेर :** शहरातील एका शाळेच्या मुख्याध्यापिकेस तेथील उपमुख्याध्यापकाने पगार कपातीवरून लक्ष्य करीत पेट्रोल टाकून पेटवून देण्याची धमकी दिली आहे. हा उपमुख्याध्यापक वारंवार त्रासदायक प्रकार करत असल्याने वैतागलेल्या मुख्याध्यापिकेने संगमनेर शहर पोलिसांत धाव घेऊन संपूर्ण कथन केले. त्यावरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून त्यास प्रतिबंधात्मक कारवाई करीत अटक केली आहे. या सततच्या त्रासाला वैतागून मुख्याध्यापिकेने शहर पोलिसांत धाव घेऊन तक्रार दिल्याने अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

# सुप्यात अवतरले रामराज्य!

## एमईटी व स्कायडेल स्कुलचे स्नेहसंमेलन



■ सुप्यातील एमईटी इंग्लिश मिडियम स्कुल आणि स्कायडेल इंटरनॅशनल स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

**सुपा : प्रतिनिधी**

**सुप्यातील एमईटी इंग्लिश मिडियम स्कुल आणि स्कायडेल इंटरनॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनानिमित्त सादर केलेल्या रामायण कथेच्या सादरीकरणाच्या निमित्ताने सुप्यामध्ये रामराज्य अवतरल्याचा अभास झाला !**

विद्यार्थ्यांनी संगीत तसेच अभिनयाच्या माध्यमातून संपूर्ण रामयण प्रक्षेकांपुढे उलगडून दाखविले. राम-सिता, लक्ष्मण, हनुमान आणि रावण यांच्या भूमिका साकारताना विद्यार्थ्यांनी अप्रतिम अभिनय सादर केला. राम-रावण युध्द, सीतेचे हरण, हनुमानाचा लंकेत प्रवेश आणि संजीवनी बुटीचा प्रसंगाला उपस्थितांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या समप्रित अभियाने प्रेक्षक भावूक झाले. स्नेहसंमेलनास प्रारंभ झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी बॉलीऊड थीम, साऊथ इंडियन थीम, पारंपारीक नृत्ये तसेच भक्तिगीतांवर आधारित नृत्य सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. लावणी, भरतनाटय, कथ्थक आदी विविध नृत्यशैलींनी कार्यक्रम रंगतदार झाला.

या स्नेहसंमेलनास देशभक्ती आणि प्रेरणादायी रूप देण्यात आले होते. अफजलखान वध, शाहिस्तेखानाची फजिती, पावनखिंडीचा पराक्रम, सिंहगडाचा लढा आणि शिजन्मोत्सव आदी प्रसंगी विद्यार्थ्यांनी अचूकपणे साकारले. शूर मराठयांच्या पराक्रमाच्या सादरीकरणामुळे अवघे सभागृह शिवमय झाले. छत्रपतींचा इतिहास विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मियतेने आणि जबाबदारीने सादर केला. अभिनय आणि संवादफेकीने उपस्थित भारावून गेले.

प्रणव गवळी, सारा शेख, उज्वल पाल, सृष्टी भांड, प्रतिक्षा शिंदे, प्रियंका पवार, तेजस कळमकर व उत्कर्षा जवक यांनी सुत्रसंचलन केले. मुख्याध्यापिका अनिथा शर्मा यांनी आभार मानले.

**कला जोपासण्याची संधी**

**आपल्या शिक्षण संकुलाची शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती समाधानकारक आहे. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होते. समाजापुढे आदर्श उभा करण्याची संधी मिळते. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि कला जोपासण्याची संधी निर्माण केली गेली.**

**अनिकेत पठारे**
**शिक्षण संकुलाचे अध्यक्ष**

# अण्णा हजारे यांना भारतरत्न पुरस्कार द्या

**निघोज : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपल्या देशासाठी सामाजिक कामातून मोठे योगदान दिले असून केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न हा देशातील सर्वोच्च पुरस्कार प्रदान करून त्यांचा उचित सन्मान करावा अशी मागणी रेनवडी ग्रामस्थ तसेच मुंबईकर रेनवडीकरांनी केली आहे.**

ग्रामस्थांनी आपल्या मागणीच्या निवेदनाच्या प्रती राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार यांना पाठविल्या आहेत. निवेदनावर बाजीराव भोर, भिवसेन येवले, संतोष येवले, कृष्णा भोसले यांच्यासह ग्रामस्थांच्या सहया आहेत.

ग्रामस्थांच्या मागणीसंदर्भात बोलताना बाजीराव भोर म्हणाले की, अण्णा हजारे हे देशाचे भुषण आहे. वयाच्या २६ व्या वर्षापासून त्यांनी देशासाठी योगदान दिले आहे. सैन्यात देशासाठी कामगिरी केल्यानंतर राळेगणसिध्दी तसेच पारनेर तालुक्यासाठी त्यांनी योगदान दिले. देशभरातील जनतेला माहितीचा अधिकार अण्णा हजारे यांच्यामुळे मिळाला. त्यांच्या सामाजिक योगदानाने जगातील लोक प्रभावित झाले आहेत इतके मोठे त्यांचे काम असल्याचे भोर यांनी सांगितले.



जनलोकपाल विधेयक हे केवळ हजारे यांच्या आंदोलनाचे फलीत आहे. ग्रामसभेला सर्वाधिकार मिळाल्याने ग्रामीण भागात विकासाची कामे त्यांच्या मागणीमुळे मार्गी लागली आहेत. आजपर्यंतच्या ६० वर्षाच्या कार्यकाळात हजारे यांनी देश हाच आपला संसार आहे असे माणून सामाजिक कामांच्या माध्यमातून देशाला प्रेरणादायी संदेश दिला आहे. जगभरातील विविध सामाजिक संस्था तसेच अनेक देशांनी त्यांच्या कामाची दखल घेत पुरस्कार देऊन त्यांना सन्मानीत केले आहे. केंद्र सरकारने पद्मश्री, पद्मभूषण हे पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला आहे. मात्र हजारे यांच्यासारख्या महान विभूतीला केंद्र सरकारने भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्याची गरज असल्याचे बाजीराव भोर यांनी सांगितले.

# ॲग्री एम.पी. हायस्कुलमध्ये शिवजयंती

## सखी मंच व सावित्री सभा बैठकीचेही आयोजन



**जामगांव : प्रतिनिधी**

**जामगांव येथील ॲग्री एम. पी. हायस्कुल येथे शिवजयंती तसेच सखी मंच व सावित्री सभा बैठक विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात पार पडली.**

विद्यालयाचे मुख्याध्यापक काशिनाथ फंड, जिजाऊ ब्रिगेडच्या रोहिणी वाघमारे, डॉ. रजनी मुळे, ग्रामपंचायत सदस्य दिलीप बर्वे, सागर बर्वे, बंडू काळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक यावेळी उपस्थित होते.

शिक्षक संतोष अडसूळ यांनी यावेळी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास उलगडून दाखविला. विद्यार्थ्यांनीही यावेळी शिवाजी महाराजांच्या जीवनावर भाषणे केली. जिजाऊ ब्रिगेडच्या रोहिणी वाघमारे यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रेरणादायी असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनावरील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमामित्त आयोजित सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शिवबाचे पोवाडे सादर केले. यावेळी उपस्थित माता-पिता पालकांसाठी मनोरंजनात्मक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. संगित खुर्ची, फुगा फुगविणे, बिस्कीट खाणे, टिकली लावणे आदी कार्यक्रमांमध्ये पालकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा उत्साह वाढविला. विजेत्या पालकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. शिक्षिका श्रीमती साळवे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

# शुभांगीनी टेकाडे यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार

## पुण्यात पुरस्कार वितरण संपन्न

**पानोली : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील माजमपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका शुभांगीनी टेकाडे-काळोखे यांना त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने नुकतेच सन्मानीत करण्यात आले. शिक्षिका शुभांगीनी टेकाडे-काळोखे या तालुक्यातील पानोली येथील रहिवासी असून माजमपूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये कार्यरत आहेत.**

बीड जिल्हयातील अंबाजोगाई येथील सृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या राज्यभरातील महिलांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.




■ शिक्षिका शुभांगीनी टेकाडे-काळोखे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने नुकतेच सन्मानीत करण्यात आले.

पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी डॉ. स्मिता बारवकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षी डोंगरे, संस्थेच्या सचिव भारती एकलोरे, अनिता काळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# हजारो भाविकांनी घेतले श्री.नागेश्वराचे दर्शन!

**पहाटेपासूनच रांगा | खिचडी प्रसादाचे वाटप | गुरुवारी रंगणार भाळवणीचा आखाडा**



**भाळवणी : प्रतिनिधी**

**येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या ग्रामदैवत नागेश्वराच्या महाशिवरात्र यात्रोत्सवानिमित्त हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासून दर्शनाच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले.दरम्यान गुरुवारी नामांकित कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे.**

मंगळवारी मध्यरात्री भगवान नागेश्वरांना मध्यरात्री लघुरुद्राभिषेक करण्यात आला.बुधवारी महाशिवरात्रिनिमित्त दुपारी शाहीर निजामभाई शेख यांचे भेदिक त्यानंतर संतदास महाराज मनसुख यांचे हरिकीर्तन झाले. तर रात्री पूनम कुडाळकर यांचा परंपरा महाराष्ट्राची हा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर छबीना मिरवणूक व फटाक्यांची आतीषबाजी करण्यात आली.

उद्या ( गुरुवारी) दुपारी कुस्त्यांचा भव्य आखाडा रंगणार आहे.या कुस्ती आखाड्याला अनेक वर्षांची जुनी परंपरा व नामवंत मल्लांचा वारसा लाभलेला आहे. सायंकाळी नामवंत लावणी सम्राट मयुरी उत्तेकर यांच्या लावण्यांचा कार्यक्रम होणार आहे या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन नागेश्वर ट्रस्ट व भाळवणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पळव्यात नैसर्गिक शेती कार्यशाळा

## प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचा उपक्रम

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचलित महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत पळवे बुद्रुक येथे आदिनाथ महिला ग्रामसंघाच्या महिलांसाठी नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यशाळेसाठी ग्रामसंघाच्या ३५ शेतकरी महिलांनी हजेरी लावली होती. हळदी कुंकवाच्या कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. बचत गटाच्या सीआरपी मंगल पळसकर यांनी कार्यशाळेचा उद्देश तसेच महत्व यासबंधी माहिती दिली. मेंटोर लिडर प्रमिला हिवाळे यांनी प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने कामरगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या व्यवसायिक प्रशिक्षण कोर्स तसचे कृषि वानिकी कार्यक्रमाविषयी माहिती दिली.



■ प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचलित महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत पळवे बुद्रुक येथे शेती कार्यशाळा संपन्न झाली.

शेती मार्गदर्शक शिवाजी व्हसाळे यांनी परसबाग, अुवन आणि नर्सरी तसेच नैसर्गिक शेती याविषयी उपस्थित महिलांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उपस्थित शेतकरी महिलांना शेवगा, पपई आणि पेरूची रोपे भेट देण्यात आली. कार्यशाळा यशस्वीतेसाठी मेंटोर प्रणिता काटकर यांनी परिश्रम घेतले.

यावेळी पळवे बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक, पळवे बुद्रुकच्या सरपंच ऋतुजाताई जाधव या उपस्थित होत्या. आदिनाथ ग्रामसंघाच्या सचिव मिनाताई जाधव, शिलाताई कळमकर, विद्याताई जाधव, मंगल शिंदे, गीतांजली पवार, सिमाताई जाधव रूक्साना तांबोळी, मनिषा कळमकर, गीतांजली पळसकर आदी सदस्य उपस्थित होते.

# कै.नामदेवराव पठारे


# ग्रामदैवतांवर श्रद्धा आणि नात्यागोत्यांवर प्रेम करणारे व्यक्तिमत्व

## आईवडिलांची सेवा ; बहिणींच्या मुलाबाळांचा अभिमान

**नामदेव बाबुराव पठारे यांचा जन्म लोणीहवेली येथे आजोळी झाला. त्यांचे वडील बाबुराव दगडू पठारे व आई सोनाबाई बाबुराव पठारे. वडील बाबुराव पठारे यांना मुळातच कुस्तीची आवड असल्याने नामदेवराव पठारे यांनाही कुस्तीमध्ये रस वाटू लागला. वडील बाबुराव पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कुस्तीचे धडे घेतले.**

बाबुराव पठारे यांचे त्या काळात शिक्षण कमी असले तरी ते सामाजिक व सांस्कृतीकदृष्टया पुढारलेले होते. त्यांच्या मुलांवर पडणे स्वाभाविक होते. मग नामदेवराव देखील त्यास कसे अपवाद राहतील ? नामदेवराव यांनी वडिलांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाचा कास धरली. पारनेर येथे प्राथमिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांनी नगर येथे माध्यमिक शिक्षणासाठी रेसिडेन्सियल हायस्कुलमध्ये प्रवेश घेतला. तिथे त्यांनी जुनी मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. विशेष म्हणजे लहानपणीपासून लागलेली बलोपासनेची आवड शिक्षण सुरू असतानाही जोपासली. सुंदर सुडौल शरीर यष्टी व त्याला शिक्षणाची जोड यामुळे नगर येथे माध्यमिक शिक्षण घेत असतानाच विद्यालयात आलेल्या वायुसेनेच्या अधिकाऱ्याची नजर नामदेवरावांवर पडली. त्यांच्यासह त्यांचे मित्र सरोदे या दोघांची भारतीय वायुदलात निवड झाल्याचे सांगण्यात आले. पुढील प्रक्रिया मुंबई येथे पुर्ण करण्यासाठी त्यांना बोलविण्यात आले. ही बाब आई सोनाबाई यांना समजल्यानंतर मुलगा इतक्या लांब जाणार म्हणून अंथरूण धरले.त्यामुळे आईच्या आग्रहाखातर नामदेवराव यांना नोकरीचा मोह त्यावेळी सोडावा लागला. पुढे त्यांना पारनेरच्या न्यायालयात लेखनिकाची नोकरी मिळाली. नऊ महिने काम केल्यानंतर त्यांची श्रीगोंदे येथे बदली झाली. गाव सोडून बाहेर नको या आईच्या भुमिकेमुळे नामेदवरावांनी कोर्टाच्या नोकरीवरही पाणी सोडले.

**माहिती श्रोत**
**■ रामचंद्र नामदेवराव पठारे**
**पोलीस उपाधीक्षक (निवृत्त)**



### आई वडीलांची सेवा

बाबुराव दगडू पठारे यांना तीन मुले व ७ मुली होत्या. त्यापैकी नामदेवराव हे एक होते. त्यांनी आई वडिलांची शेवटपर्यंत सेवा केली. धाकटे बंधू शिवाजीराव यांचे शिक्षण पुर्ण करून त्यांना नोकरीनिमित्त पुणे येथे जाऊन स्थायीक होईपर्यंत नामदेवराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व बहिणींचा पाहुणचार त्यांनी रितीरिवाजाप्रमाणे पुर्ण केला. सात पैकी अपंग असलेल्या एका बहिणीचा त्यांनी मुलीप्रमाणे सांभाळ केला. त्यांनी कधीही कोणत्याही नातेवाईकाला दुरावा दिला नाही.

### खंदारे परिवारात नात्याचा धागा

नामदेवराव यांचे लग्न वाडेगव्हाण येथील प्रगतीशिल शेतकरी बाजीराव शिवराम खंदारे यांची मुलगी सिंधूबाई यांच्याबरोबर झाला. पुढे ही दोन्ही कुटूंब एकमेकांना नात्याच्या धाग्यात जोडली गेल्याने शेती-वाडीच्या कामासाठी ही कुटूंब एकमेकांसाठी उपयोगी पडत.

### मुलांच्या शिक्षणावर लक्ष

नामदेवराव हे स्वतः जुन्या काळात शिकलेले असल्याने शिक्षणाचे महत्व त्यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या पाचही आपत्यांना चांगले शिक्षण दिले. महिन्यातून एकदा शाळेला भेट देऊन मुले शाळेत येतात का ? अभ्यास करतात का याची ते आवर्जुन चौकशी करत.

### नावाजलेले पहिलवान

नामदेवरावांची शरीरयष्टी उत्कृष्ट होती. लहानपणीपासून बलोपासना केल्याने पारनेर तालुक्यासह आजूबाजूच्या तालुक्यांमध्येही ते एक नावाजलेले पहिलवान होते. उत्कृष्ट शरीर यष्टी व कुस्तीमधील नैपुण्य हेच त्यांच्या यशाचे गमक होते.

### मृदू स्वभावाचे कुटूंबवत्सल व्यक्तिमत्व

कुस्तीगीर असूनही नामदेवराव अत्यंत मृदू स्वभावाचे, उच्च विचारसरणी, साधी राहणी, आई वडिलांवर निःस्सीम प्रेम असे त्यांच्या स्वभावाचे काही पैलू होते. ते एक कुटूंबवत्सल व्यक्तिमत्व असल्याने केवळ आपले कुटूंबच नाही तर आपल्या बहीणींच्या कुटूंबाकडेही त्याचे बारकाईने लक्ष असे. त्यांचे माहेरपण, येणे-जाणे ते आनंदाने स्विकारत.

### ...म्हणून नोकरीवर पाणी सोडले

नोकरीच्या चांगल्या संधी आलेल्या असताना त्याचा नामदेवराव यांना फायदा घेता आला नाही. त्याबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनाही त्याचे शल्य होते. मात्र ते सांगत की त्यांच्या कुटूंबावर त्यापूर्वी फार मोठा आघात झालेला होता. त्यामुळे काळजीपोटी त्यांची आई कोणासही पारनेर सोडून बाहेर जाण्यास मान्यता देत नसे.

### परमेश्वरावर नितांत श्रध्दा

नामदेवराव हे मोठया धार्मिक वृत्तीचे होते. परमेश्वरावर त्यांची नितांत श्रध्दा होती. त्यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक धार्मिक कार्यामध्ये लहान मोठे योगदान दिले. पारनेर येथील नागेश्वर मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर, बोळकोबा गल्लीतील गणेश मंदिर येथे दर्शनाचा त्यांचा दररोजचा नित्यक्रम कधीही चुकत नसे. दर्शनासाठी ते पठारे मळयातून दररोज पायी येत. त्यात देवदर्शनाबरोबच त्यांचा व्यायामही होत असे. नागेश्वर मंदिरात रूद्राभिषेक, लक्ष्मीनारायण मंदिरात विष्णू सहस्त्रनाम स्तोत्राचा जप, बोळकोबा मंदिरात गणपती मंदिरात गणपती अथर्वशिर्षाचे पारायण याला त्यांची न चुकता हजेरी असे.

### गणपतीची पुजा-अर्चा-अभिषेक

बोळकोबा गल्लीत पठारे परिवाराचे गणपती मंदिर आहे. गणपतीची रोजची पुजा,अर्चा, अभिषेक ते करून घेत. याच मंदिरामुळे पठारे परिवारास इनामी जमीन कसण्यास मिळाली असून त्यावर परिवाराचा उदरनिर्वाह चालतो.

### गणपती मंदिराचा जिर्णोध्दार

बोळकोबा गल्लीतील गणपती मंदिर जिर्ण होऊन त्याची पडझड झाली होती. त्यासाठी नामदेवराव यांनी मंदिराचा जिर्णोध्दार करण्याचा निर्णय घेतला. त्यात त्यांचे बंधू स्व. शिवाजीराव यांची मोलाची साथ लाभली. मंदिरासाठी जागा कमी पडू लागल्याने त्यांनी अजित जेऊरकर यांच्याकडे जागेची मागणी केल्यानंतर जेऊरकर यांनी मंदिरासाठी जागा दिली. त्यामुळेच तिथे प्रशस्त मंदिर उभारता आले.

### पारनेरकर, हजारे यांच्याशी जिव्हाळयाचे संबंध

नामदेवराव हे रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे शिष्य होते. त्यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळयाचे संबंध होते. पारनेरकर महाराजांनी पारनेरमध्ये तालीम उभारून मल्ल तयार करण्याची जबाबदारी नामदेवराव यांच्यावर सोपविली होती. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे नामदेवराव हे समवयस्क. त्यांच्याशीही त्यांची जिव्हाळयाचे संबंध होते.

# स्व.नामदेवराव पठारे

# कुस्तीगीर , इंग्रजीपटू ते आदर्श शेतकरी

## आईच्या शब्दाखातर सोडले नोकऱ्यांवर पाणी

**नामदेव बाबुराव पठारे यांचा जन्म १ जुन १९२९ रोजी लोणीहवेली येथे झाला. त्यांना लहानपणीपासूनच कुस्तीची आवड होती. पुढे ते गावोगावचे कुस्तीचे आखाडे गाजवू लागले. आखाडयांमध्ये कुस्ती खेळल्यानंतर बऱ्याचदा ते अजिंक्य होऊनच परतत.**

नगरच्या रेसिडेन्सियल हायस्कुलमध्ये शिक्षण घेत असताना त्यांची भारतीय वायुदलामध्ये निवड झाली होती. परंतू केवळ आईच्या विरोधामुळे त्यांनी वायुदलामध्ये नोकरी करण्याचा नाद सोडून दिला. वायुदलात पायलट पदावर काम करण्याची संधी त्यांना मिळणार होती. मात्र आईच्या इच्छेखातर वायुदलाच्या नोकरीस त्यांना नकार द्यावा लागला.



### इंग्रजी विषय आवडीचा

नगरच्या रेसिडेन्सियल हायस्कुलमध्ये नामदेवराव पठारे यांचे माध्यमिक शिक्षण झाले. जुनी मॅट्रीक परीक्षा ते तिथे उत्तीर्ण झाले. इंग्लिश हा त्यांचा आवडता विषय. आम्हा पाचही भावंडांना ते इंग्लिश हा विषय शिकवत.

### अण्णांचा दिनक्रम

भल्या सकाळी उठून जनावरांचे चारा-पाणी केल्यानंतर गायी-म्हशींच्या धारा काढून त्याच्या विक्रीसाठी ते जात. पारनेमधील अनेक कुटूंबांना ते दुधाचा रतीब घालीत. दुग्ध व्यवसायाची कामे आटोपल्यानंतर नागेश्वर मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर, पठारे परिवाराचे गणपती मंदिर येथे दर्शनासाठी ते नियमित जात. दररोज ज्ञानेश्वरीचे पारायण करत. देव-धर्मावर त्यांची नितांत श्रध्दा होती.

### नोकरीच्या संधी गेल्यानंतर शेतीलाच प्राधान्य

वायुदलातील नोकरीची संधी हुकल्यानंतर त्यांनी पारनेर न्यायालयात लेखनीक म्हणून नोकरी पत्करली. नऊ महिन्यांच्या कालखंडानंतर त्यांची श्रीगोंदे न्यायालयात बदली झाली. पारनेर सोडून बाहेर जायचे नाही हा आईचा आग्रह असल्याने त्यांनी न्यायालयाच्या नोकरीवरही पाणी सोडले. त्यानंतर त्यांनी पारंपारीक शेती व्यवसाय करणे पसंत केले.

### विष्णू महाराजांना कुस्तीचे धडे

रामचंद्र महाराज पारनेरकर यांनी अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांसाठी तालीम बांधून दिल्यानंतर तिथे ते कुस्ती खेळत. त्याच तालमीमध्ये रामचंद्र महाराज यांचे चिरंजिव विष्णू महाराज पारनेरकर यांना कुस्तीचे धडे दिले. स्वतः विष्णू महाराज ही आठवण आजही सांगतात.


### बहिणींविषयी आत्मियता


नामदेवराव पठारे यांना सात बहिणी आणि त्यांच्यासह तिघे भाऊ. दहा जणांचा बहिण भावंडांचा हा परिवार. त्यांनी बहिणी, त्यांच्या मुला मुलींचा सांभाळ केला. शिक्षणासाठीही त्यांच्या बहिणींची मुले त्यांच्याजवळ राहत. आई वडील व दोन बहिणींचा त्यांनी शेवटपर्यंत सांभाळ केला.

### नोकरांना कधीही अंतर दिले नाही

शेती करताना अण्णांच्या शेतामध्ये काम करण्यासाठी भरपूर नोकर चाकर असत. त्यांनाही ते आपल्याच घरातील सदस्य समजत. त्यांना अण्णांनी कधीच आंतर दिले नाही. जेवण करताना अण्णांच्या ताटाशेजारीच नोकर-चाकरांची ताटे असत. त्यांना कोणत्याही अडचणी आल्यास ते नेहमी मदतीचा हात पुढे करत.

शब्दांकन
■ संजिवनी गोरे
■ निर्मला थोपटे




'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com